आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
८ ऑगस्ट २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- गदारोळामुळे आजही लोकसभेचं कामकाज ३ पर्यंत तर राज्यसभेचं दिवसभरासाठी तहकूब
- गरजू आणि पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचं आश्वासन
- शालार्थ प्रणालीद्वारे बोगस शिक्षक भरती प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारकडून समितीची स्थापना

**आणि**

- राज्याच्या किनारी भागात आज नारळी पौर्णिमेचा उत्साह

**<><><><>**

भारत छोडो आंदोलनातल्या स्वातंत्र्यसैनिकांना आज संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे आदरांजली वाहण्यात आली. महात्मा गांधींनी पुकारलेल्या या आंदोलनाला उद्या ८३ वर्ष होत असून देशाच्या अविरत स्वातंत्र्यलढ्याचा हा निर्णायक टप्पा होता असं राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश यांनी सांगितलं. बिहारमधलं मतदारयाद्यांचं पुनरिक्षण आणि इतर विविध मुद्द्यांवर विविध पक्षांकडून आलेले २० स्थगन प्रस्ताव त्यांनी फेटाळले. त्याच्या निषेधात सदस्यांनी घोषणाबाजी सुरू केली. या अधिवेशनात व्यत्यय आल्यानं राज्यसभेच्या कामकाजाचे ५६ तास वाया गेले असल्याचं हरिवंश यांनी सांगितलं. गदारोळामुळे सभागृहाचं कामकाज त्यांनी आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित केलं.

लोकसभेत माजी सदस्य सत्यपाल मलिक यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करुन आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर सभापती ओम बिरला यांनी प्रश्नोत्तराचा तास घेण्याचा प्रयत्न केला. मात्र मतदार याद्या पुनरिक्षणावर चर्चेची मागणी करत विरोधी पक्ष सदस्यांनी प्रचंड गदारोळ केला. सभापतींनी आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर ३ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं.

**<><><><>**

खतांची तस्करी आणि साठेबाजी रोखण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही आज रसायने आणि खत मंत्री जे पी नड्डा यांनी लोकसभेत दिली. प्रश्नोत्तराच्या

तासात पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. खतांना जीवनावश्यक वस्तूंचा दर्जा कायद्यानं दिलेला असून राज्य सरकारांना त्याअंतर्गत काळाबाजार रोखण्यासाठी पुरेसे अधिकार दिल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

अत्यावश्यक वापराची ४ औषधं आणि ३७ औषध फॉर्मुलेशनच्या कमाल किंमतीवर मर्यादा आणण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. संसर्ग, हृदयरोग, मधुमेह यावरच्या औषधांचा यात समावेश आहे. ब्रँडेड किंवा जेनरिक औषध विक्रेत्यांनी कमाल किमतीची मर्यादा ओलांडू नये असं राष्ट्रीय औषध मूल्य प्राधीकरणानं म्हटलं आहे. मात्र ज्यांच्या किमती कमाल किमतीपेक्षा कमी आहेत त्यांनी सध्याची किंमत कायम ठेवावी असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

राज्यातल्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विषय लांबणीवर पडला नसून गरजू आणि पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळेल, असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांना सांगितलं. खऱ्या अर्थाने मदत हवी आहे, अशा शेतकऱ्यांचा विचार करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीचा अहवाल आल्यानंतर कर्जमाफीबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल, असं ते म्हणाले. तुकडेबंदी कायद्यामुळे ज्या मिळकतींची नोंदणी होत नाही, अशा घरमालकांच्या समस्यांवर लक्ष दिलं जात आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

शालार्थ प्रणालीद्वारे बोगस शिक्षक भरती प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारनं एका समितीची नेमणूक केली आहे. पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार समितीचे अध्यक्ष असून पोलीस महानिरीक्षक मनोज शर्मा यांचाही यात समावेश आहे. ही चौकशी समिती राज्यातल्या सर्व उपसंचालक कार्यालया अंतर्गत शाळांमधल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बदलीची तपासणी करेल आणि त्याचा अहवाल शासनाला सादर करेल.

**<><><><>**

मुंबई-गोवा महामार्गावरून गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्यांचा प्रवास सुरक्षित व्हावा याकरता सर्व प्रकारच्या उपाययोजना करत असल्याचं सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज रत्नागिरीत पत्रकार परिषदेत सांगितलं. या मार्गावर नऊ ते दहा ठिकाणी सुविधा केंद्रं उभारली जाणार आहेत, तसंच, मुंबई-गोवा महामार्गाचं एकंदर काम ९० ते ९५ टक्क्यांपर्यंत पूर्ण झालं असून, रायगड जिल्ह्यातला माणगाव-इंदापूर भाग वगळता या महामार्गाचं काम येत्या वर्षअखेरपर्यंत पूर्ण करु अशी ग्वाही त्यांनी दिली. शिवेंद्रसिंहराजे भोसले कालपासून मुंबई-गोवा महामार्गाच्या पाहणी दौऱ्यावर असून, आज त्यांनी रत्नागिरीत आढावा बैठक घेतली. त्या बैठकीला जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह, जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे, आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

रत्नागिरी जिल्ह्यातल्या संगमेश्वरजवळचं काम रखडल्याबद्दल कंत्राटदाराला दंड आकारण्यात आला असून, आता काम वेळेत न झाल्यास कारवाई केली जाणार आहे. १५ वर्षांहून अधिक काळ रखडलेला हा देशातला एकमेव महामार्ग आहे, असं सांगतानाच रस्ता सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या कामांसाठी २०० कोटी रुपयांच्या स्वतंत्र निधीचा प्रस्ताव तयार केला जात आहे, अशी माहितीही भोसले यांनी दिली.

**<><><><>**

आज नारळी पौर्णिमा. श्रावण पौर्णिमेला येणारा हा सण विशेषतः किनारपट्टीवरच्या मच्छिमार समाजात उत्साहाने साजरा केला जातो.

- **- होल्ड - मनीष व्हाइस कास्ट - -**

**<><><><>**

धुळे इथल्या यमुनाई शैक्षणिक आणि सांस्कृतिक महिला मंडळाच्या दिव्यांग मुलींच्या शाळेतल्या विद्यार्थिनींनी पोलीस ठाण्यात रक्षाबंधन साजरं केलं. यावेळी पोलीस कर्मचाऱ्यांनी या विद्यार्थिनींना भेटवस्तू दिल्या.

**<><><><>**

बुलडाणा जिल्ह्यातल्या संग्रामपूर तालुक्यातल्या एका शेतकऱ्याने अभ्यासपूर्ण नियोजनाच्या माध्यमातून थेट इराणमध्ये केळ्यांची निर्यात सुरू केली आहे. तीन वर्षांपूर्वी नैसर्गिक आपत्तीमुळे शेत उद्ध्वस्त होऊनही न डगमगता सतीश टाकळकर यांनी आसपासच्या गावातल्या केळी उत्पादक शेतकऱ्यांसह निर्यातयोग्य दर्जाच्या केळ्यांचं

उत्पादन घेतलं आहे. या निर्यातीतून त्यांना उत्तम मोबदलाही मिळाला आहे. याविषयी बोलताना टाकळकर म्हणाले

**- होल्ड.. बाईट - सतीश टाकळकर - -**

**<><><><>**

हिंगोली जिल्ह्यातल्या मातोश्री सावित्रीबाई फुले आदिवासी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक राख्या तयार केल्या आहेत. धान्यापासून बनवलेल्या या राख्यांविषयी जाणून घेऊया आमच्या वार्ताहरांकडून

**-- होल्ड - हिंगोली व्हाइस कास्ट—**

**<><><><>**

नाशिक जिल्ह्यात नांदगाव इथे आज सकाळी मालगाडीचा डबा रुळावरून घसरल्याने चाळीसगावच्या दिशेने जाणारी रेल्वे सेवा बंद झाली. ही मालगाडी रुळ बदलत असताना एक डबा रुळावरून घसरला. त्यामुळे दिल्ली ते मुंबई दरम्यान चालणाऱ्या राजधानी एक्सप्रेस गाडीला थांबवण्यात आलं. या दुर्घटनेत कुठलीही जीवितहानी झालेली नाही. मध्य रेल्वेच्या पथकाकडून डब्याला पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**<><><><>**

ठाणे जिल्ह्यात भाईंदर इथं ट्रक आणि मोटार सायकलमध्ये झालेल्या टकरीत एका दांपत्याचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर ट्रक चालकाला पोलिसांनी अटक केली आहे.

**<><><><>**

वाशिम जिल्ह्यामध्ये काल रात्रीपासून सर्वत्र पाऊस सुरू आहे. पंधरा दिवसाच्या विश्रांतीनंतर पावसाचे आगमन झाल्यामुळे पिकांना जीवदान मिळालं आहे. शेलू खडसे इथं जोरदार पाऊस झाला तर मालेगाव तालुक्यातल्या राजुरा परिसरामध्ये प्रचंड पावसानं शेतीत पाणी साचलं आहे.

**<><><><>**

नंदुरबार जिल्ह्यातल्या नवापूर शहरात एटीएम फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या ६ पैकी ५ फरार आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. त्यात दोन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. ते गुजरातच्या उच्छलचे रहिवासी आहेत.

दरम्यान, आताच हाती आलेल्या वृत्तानुसार लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

**//<><><><>//**